| MHKO160003752013 | नियमित दिवाणी दावा क्र.९२/२०१३ मधील निशानी क्र ३६ वरील आदेश |
|---|---|

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा कब्जाबाबत व कायम मनाईबाबत दाखल केला आहे. वादीचे कथन केले आहे की, वादीचे दावा गट नं १९२८ मधून सागाव बांबवडे रस्ता गेला आहे, दावा मिळकत घरास ग्रा.पं. नंबर पडले आहेत, त्याचा उल्लेख दाव्याचे कामी येणे आवश्यक आहे. दावा चालू असता प्रतिवादींनी दावा मिळकत गट नं १९२८ मध्ये दावा मिळकत घराचे लगत संडासचे बांधकाम केले आहे, या सर्व बाबी या न्यायाचे हेतुसाठी रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे. त्यामुळे वादी यांनी अर्जात नमूदप्रमाणे दावा अर्जी कलम १अ मध्ये दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये मजकुर, कलम २ मध्ये कलम २अ प्रमाणे मजकुर, कलम २ब म्हणून मजकुर, कलम ३ मध्ये कलम ३अ प्रमाणे मजकुर, कलम ८ मध्ये नमूदप्रमाणे मजकुर दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी व अर्ज मंजूर व्हावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी सदर अर्जास नि.४१ वर म्हणणे दिलेले आहे. प्रतिवादी यांनी कथन कले की, वादीचा अर्ज साफ चुकीचा, लबाडीचा, खोट्या स्वरूपाचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांचे दावा मिळकतीचे स्वरूप बदलत आहे, या दावा दुरूस्तीमुळे मे. कोर्टाचे ज्युरिडिक्शनमध्ये वाढ होत असलेने दावा या मे. कोर्टात चालणेस पात्र नाही. या मिळकतीमध्ये अन्य दोन-तीन घरे आहेत व ती देखिल नोंद करणे गरजेचे आहे. सदरच्या दावा दुरूस्तीमुळे प्रतिवादींची हानी होत आहे व दाव्याचा समतोल बिघडत आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचा सदरचा अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०४. मी वादी, प्रतिवादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील कागदपत्रे, वादी आणि प्रतिवादी यांचे वादपत्र यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा कब्जाबाबत व कायम मनाईबाबत दाखल केला आहे. वादी यांनी अर्जात नमूदप्रमाणे दावा अर्जी कलम १अ मध्ये दावा मिळकतीच्या वर्णनामध्ये मजकुर, कलम २ मध्ये कलम २अ प्रमाणे मजकुर, कलम २ब म्हणून मजकुर, कलम ३ मध्ये कलम ३अ प्रमाणे मजकुर, कलम ८ मध्ये नमूदप्रमाणे मजकुर दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे. तथापि प्रतिवादी सदरचा अर्ज लबाडीचा,

खोट्या स्वरूपाचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही असे कथन केले आहे. वादी यांचे अर्जाचे स्वरूप पाहता तो मंजूर झाल्यास दाव्याचे मुळ स्वरूपावर कोणताही बदल होणार नाही. वादी यांनी अर्जामध्ये नमूद केलेली दुरूस्ती ही वादी आणि प्रतिवादीं यांचेदरम्यानचा मुख्य वाद निकाली करण्यासाठी आवश्यक आहे. तसेच, एकाच दाव्यामध्ये दोन्ही पक्षकारांचे सर्व मुद्दे निकाली निघणे गरजेचे आहे. सदर दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी व सदर दाव्यात विविध निरनिराळे वाद टाळण्यासाठी सदरची दुरूस्ती मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद कारणांवरून वादी यांची अर्जातील विनंती मान्य करण्यास पात्र आहे असे स्पष्ट होत आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

०१ अर्ज नि. ३६ मंजूर करण्यात येत आहे.

०२. वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रू.५००/- द्यावे या अटीवर वादी यांना वादपत्रामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी देण्यात येत आहे आणि वादी यांनी अर्जामध्ये नमूद दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दुरूस्त दावा प्रत न्यायातयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Amol Shriram Shinde
Date: 2022.11.23 10:53:17 +0530

दिनांक- २१/११/२०२२

( अमोल श्रीराम शिंदे )
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
मलकापूर-शाहूवाडी